# अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

## पुरवठा निरीक्षक आणि उच्चस्तर लिपिक पदांच्या भरतीच्या ऑनलाईन परीक्षेसाठी माहिती पुस्तिका

उमेदवार देणार असलेल्या ऑन-लाईन परीक्षेच्या विविध पैलूंचा तपशील आणि संबंधित बाबीसंबंधात महत्वाच्या सूचना या पुस्तिकेत आहेत. परीक्षेची तयारी करण्यात मदत व्हावी म्हणून उमेदवाराने या पुस्तिकेचे नीट अध्ययन करण्यास सुचविले जात आहे.

खाली दर्शविल्याप्रमाणे ऑन-लाईन परीक्षेत वस्तुनिष्ठ स्वरूपाचे बहुपर्यायी प्रश्न असतील.

**परीक्षेच्या प्रश्नावलीचे स्वरूप**

| अनु.क. | प्रश्नावलीचे नाव | प्रश्न संख्या | अधिकतम गुण | माध्यम | अवधि |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मराठी भाषा | 25 | 50 | मराठी | 120 मिनिटे |
| 2 | इंग्रजी भाषा | 25 | 50 | इंग्रजी | |
| 3 | सामान्य ज्ञान | 25 | 50 | द्विभाषी अर्थात इंग्रजी आणि मराठी | |
| 4 | बुद्धिमत्ता चाचणी व संख्यात्मक क्षमता | 25 | 50 | | |
| | **एकूण** | **100** | **200** | | **120 मिनिटे** |

परीक्षेसाठी 120 मिनिटांचा अवधि आहे, तरीही उमेदवारास परीक्षास्थानी अनुक्रमे 180 मिनिटे थांबावे लागेल, ज्यामध्ये नोंद करणे (logging in), प्रवेशपत्र गोळा करणे, सूचना देणे इ. साठी लागणा-या कालावधीचासुद्धा समावेश आहे. दिलेल्या 120 मिनिटांत कोणत्याही प्रश्नावलीमधील कोणताही प्रश्न सोडवू शकतात. वस्तुनिष्ठ प्रश्नांना बहुपर्याय असतील. प्रश्नासाठीच्या पाच उत्तरांपैकी, फक्त एकच अचूक उत्तर असेल. **उमेदवारास अचूक उत्तराची निवड करावयाची आहे आणि उमेदवारास वाटत असलेल्या योग्य/अचूक पर्यायावर 'माउस-क्लिक' करावयाचा आहे. उमेदवाराने क्लिक केलेला पर्याय ठळकपणे दर्शविला जाईल आणि त्यास उमेदवाराचे त्या प्रश्नाचे उत्तर म्हणून समजले जाईल. कम्प्यूटर वर प्रश्न दर्शविले जातील. उमेदवाराने दर्शविलेल्या चुकीच्या उत्तरासाठी गुण वजा केले जाणार नाहीत. परंतु अंदाजाने कोणतेही उत्तर अंकीत करू नये असा तुम्हाला सल्ला आहे.**

**कृपया नोंद घ्यावी की या पुस्तिकेत दिलेले प्रश्नांचे प्रकार हे केवळ उदाहरणादाखल आहेत आणि सर्वसमावेशक नाहीत. प्रत्यक्ष परीक्षेत तुम्हाला यापैकी काही किंवा सर्व प्रकारांचे, अधिक काठीण्य पातळीचे प्रश्न आढळतील, शिवाय या ठिकाणी नमूद नसलेल्या इतर प्रकारांवरही प्रश्न आढळतील.**

नमुन्यादाखल काही प्रश्न खाली दिले आहेत.

## नमुना प्रश्न

## मराठी भाषा

**प्र.1-2.** पुढील प्रत्येक प्रश्नात वाक्याचे चार भाग पाडले आहेत. व्याकरणाच्या, वाक्य रचनेच्या किवा भाषेच्या दृष्टीने वाक्य सदोष असल्यास, कोणत्या भागात दोष आहे ते ठरवून त्या भागाचा क्रमांक उत्तर म्हणून द्या. वाक्य निर्दोष / बिनचूक असल्यास उत्तर “(5)” द्या.

**प्र.1.** इंग्लंडमधून जन्मलेल्या (1) / कुसुमाग्रजांना शेक्सपियर म्हणतात (2) / व हिंदुस्थानात जन्मलेल्या शेक्सपियरांना (3) / कुसुमाग्रज म्हणतात (4) निर्दोष (5)

**प्र.2.** माझ्या स्मरणशक्तीनुसार (1) / माझ्या बाळपणी माझ्या वडिलांची बदली (2) / एका गलिच्छ गावी (3) / झाली आहे. (4) निर्दोष (5)

**प्र.3-4.** पुढे काही शब्दसमूह दिले आहेत. त्याला समानार्थी असणारा एक शब्द दिलेल्या पर्यायातून निवडा.

**प्र.3.** स्वतःच स्वतःची सर्व कामे करणारा.

(1) स्वयंभू (2) स्वावलंबी (3) स्वयंचलित (4) स्वकष्टार्जित (5) स्वाध्यायी

**प्र.4.** कोणतेही काम करू शकणारा.

(1) बहुश्रुत (2) हुषार (3) चलाख (4) हरहुन्नरी (5) डोकेबाज

**प्र.5** पुढील शब्द समूहाचा अर्थ सांगणारा एक शब्द दिलेल्या पर्यायातून निवडा.
देव आहेसे मानणारा

(1) नास्तिक (2) आस्तिक (3) भक्त (4) संत (5) दिलेल्या पर्यायांव्यतिरीक्त अन्य

## इंग्रजी भाषा

**Q.1.** Read each sentence to find out whether there is any grammatical or idiomatic error in it. The error, if any, will be in one part of the sentence. The number of that part is the answer. If there is no error, the answer is 'No error'. (Ignore the errors of punctuation, if any).

Most of the third world / country are experiencing / the ethnic or communal problem / in varying degrees. No error

(1) Most of the third world / (2) country are experiencing / (3) the ethnic or communal problem / (4) in varying degrees. (5) No error

**Q.2.** Pick out from the words given below each sentence the word which would complete the sentence correctly and meaningfully.

Continuous unemployment has induced in the people a kind of _____ which is most depressing.

(1) laziness (2) encouragement (3) satisfaction (4) anger (5) awakening

**Q.3-5.** In the following passage there are blanks, each of which has been numbered. These numbers are printed below the passage and against each, five words are suggested, one of which fits the blank appropriately. Find out the appropriate word in each case.

The true source of rights is duty. If we all ( 3 ) our duties, rights will not be ( 4 ) to seek. If leaving duties unperformed we run ( 5 ) rights, they will escape us like an elusive person.

**Q.3.** (1) deny (2) devote (3) discharge (4) imagine (5) fulfill

**Q.4.** (1) far (2) close (3) easy (4) against (5) common

**Q.5.** (1) as (2) after (3) at (4) from (5) for

## सामान्य ज्ञान

**प्र.1.** कोणत्या देशाने क्रिकेट - विश्वचषक 2007 जिंकला ?

(1) दक्षिण आफ्रिका (2) श्रीलंका (3) इंग्लंड (4) न्यूझिलंड (5) दिलेल्या पर्यायां व्यतिरीक्त

**प्र.2.** महाराष्ट्रात खालील पैकी कोणते पीक घेतले जात नाही ?

(1) ज्वारी (2) गहू (3) ज्यूट (4) कापूस (5) तंबाखू

**प्र.3.** महाराष्ट्रात खालीलपैकी कोणत्या शहरात कुंभमेळा भरतो ?

(1) पुणे (2) रत्नागिरी (3) नाशिक (4) पंढरपूर (5) कोल्हापूर

**प्र.4.** अवैध पैशाविरूद्धच्या लढाईमध्ये खालीलपैकी कोणत्या वित्तीय संस्थेने 'आपल्या ग्राहकांना जाणा' (Know Your Customer) योजनेची सुरूवात केली ?

(1) आय डी बी आय (2) आर बी आय (3) नाबार्ड (4) सीडबी (5) दिलेल्या पर्यायांव्यतिरीक्त अन्य

**प्र.5.** खालीलपैकी कोणत्या राज्याची सीमारेषा महाराष्ट्राच्या सीमारेषेशी लागून नाही ?

(1) छत्तीसगढ़ (2) कर्नाटक (3) आन्ध्र प्रदेश (4) राजस्थान (5) गुजरात

## बुद्धिमत्ता चाचणी व आंकिक क्षमता

**प्र.1.** 42 + 73 + 137 = ?

(1) 352 (2) 252 (3) 242 (4) 142 (5) यापैकी एकही नाही

**प्र.2.** $20 \times \frac{1}{2} = ?$

(1) 4 (2) 5 (3) 12 (4) 20 (5) यापैकी एकही नाही

**प्र.3.** जर एका लिंबाला 10 पैसे तर 6 लिंबांची किमत किती पैसे ?

(1) 6 (2) 10 (3) 60 (4) 61 (5) यापैकी एकही नाही

**प्र.4-6.** निम्नलिखित सारणीचा काळजीपूर्वक अभ्यास करा आणि खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे द्याः

**एका निवड परीक्षेमध्ये लेखी परीक्षेत मधुन 100 मधुन आणि इंटरव्यू मधील 300**
**उमेदवारांना प्राप्त गुणांकानुसार उमेदवारांचे वर्गीकरण 1000**

| लेखी परीक्षा गुण | इंटरव्यू चे गुण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 30 पेक्षा कमी | 30-39 | 40-49 | 50-59 | 60-69 | 70 आणि अधिक |
| 260 आणि अधिक | 8 | 18 | 26 | 18 | 26 | 4 |
| 210 ते 259 | 5 | 4 | 30 | 22 | 10 | 9 |
| 160 ते 209 | 16 | 10 | 45 | 56 | 18 | 9 |
| 110 ते 159 | 28 | 42 | 100 | 190 | 15 | 5 |
| 60 ते 109 | 35 | 115 | 20 | 8 | 7 | 5 |
| 60 पेक्षा कमी | 32 | 32 | 20 | 4 | 6 | 2 |

**प्र.4.** किती उमेदवारांना लेखी परीक्षा आणि इंटरव्यू दोन्हीं मध्ये 69 टक्के आणि अधिक गुण मिळाले आहेत ?

(1) 22 (2) 49 (3) 13 (4) 9 (5) दिलेल्या पर्यायांव्यतिरिक्त अन्य

**प्र.5.** जवळपास 325 उमेदवारांना लेखी परीक्षेत पास व्हावयाचे आहे तर पास होण्यास किती टक्के गुण आवश्यक आहेत ?

(1) 20 हून अधिक (2) 70 हून अधिक (3) 36 हून अधिक (4) 63 हून अधिक (5) दिलेल्या पर्यायांव्यतिरिक्त अन्य

**प्र.6.** जवळपास 42 टक्के उमेदवार इंटरव्यू च्या खालील गुणांच्या कोणत्या पंक्तित बसतात ?

(1) 110-159 (2) 110 आणि कमी (3) 50 ते 70 (4) 50 आणि अधिक (5) दिलेल्या पर्यायांव्यतिरिक्त अन्य

### (अ) ऑन-लाईन परीक्षेच्या स्वरूपाबद्दलचे तपशील :

(1) परीक्षा ऑन-लाईन म्हणजेच संगणकावर घेतली जाईल.

(2) मराठी भाषा व इंग्रजी भाषा प्रश्नावली व्यतिरिक्त सर्व प्रश्नावल्या इंग्रजी आणि मराठीत असतील.

(3) सर्व प्रश्नांना बहुपर्याय असतील. प्रश्नासाठीच्या पाच उत्तरांपैकी केवळ एकच अचूक उत्तर असेल. **परीक्षार्थीला अचूक उत्तराची निवड करावयाची असून जो पर्याय उचित/अचूक वाटतोय त्या पर्यायावर 'माउस-क्लिक' करावयाचे आहे. 'क्लिक' केला गेलेला पर्याय ठळकपणे दर्शविला जाईल आणि त्यास प्रश्नाचे उत्तर म्हणून समजले जाईल. एखाद्या प्रश्नाच्या उत्तरास अंतिम मुल्यांकनासाठी तेव्हाच विचारात घेतले जाईल जेव्हा उमेदवाराने 'Save & Next' वर किंवा 'Mark for Review & Next' वर क्लिक करुन उत्तर दिले असेल.**

(4) सर्व्हर मध्ये घडयाळ लावलेले आहे आणि तुमच्या संगणक पटलाच्या वरच्या उजव्या कोप-यातील ऊर्वरीत वेळ दर्शविणारा टाईमर परीक्षा पूर्ण करण्यासाठी शिल्लक राहिलेली वेळ दर्शवेल. जेव्हा घड्याळात दर्शविलेली वेळ संपेल तेव्हा परीक्षा आपोआप बंद होईल. तुम्हाला स्वतःहून परीक्षा संपवण्याची किंवा थांबवण्याची आवश्यकता नाही.

(5) स्क्रीनच्या उजव्या बाजूला Question पॅलेट दाखवले जाणार असून ते खालील पैकी एक चिन्ह वापरुन प्रत्येक प्रश्नाची स्थिती दाखवेल :

 **तुम्ही अजून ह्या प्रश्नापर्यंत पोहोचला नाहीत.**

 **तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शवले नाही.**

 **तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविले आहे.**

 **तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले नाही, परंतु ह्या प्रश्नाच्या पडताळणीसाठी खूण केली आहे.**

 **तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविले आहे, परंतु पडताळणीसाठी त्यावर खूण केली आहे.**

'पडताळणीसाठी खूण केल्याची' स्थिती निव्वळ ह्याचे स्मरण देते की तुम्ही हा प्रश्न पुन्हा पाहण्याचे ठरवले आहे. जर पडताळणीसाठी खूण केलेल्या प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले असेल तर अंतिम मुल्यांकनामध्ये ते उत्तर गृहित धरले जाईल.

(6) उत्तर दर्शवण्यासाठी प्रश्न निवडायचा असल्यास आपण खालीलपैकी एक करू शकता :

(अ) थेट त्या क्रमांकाच्या प्रश्नाकडे जाण्यासाठी पटलाच्या उजवीकडील प्रश्न तालिकेमध्ये त्या क्रमांकाच्या प्रश्नावर क्लिक करा. कृपया लक्षात राहू द्या की हा पर्याय निवडल्यास तुमचे चालू प्रश्नाला दर्शविलेले उत्तर सुरक्षित केले जात **नाही.**

(ब) चालू प्रश्नाचे उत्तर सुरक्षित करण्यासाठी 'Save and Next' वर क्लिक करा आणि क्रमाने पुढच्या प्रश्नाकडे जा.

(क) चालू प्रश्नाचे उत्तर सुरक्षित करुन पडताळणीसाठी खूण करण्यासाठी 'Mark for Review and Next' वर क्लिक करा क्रमाने पुढच्या प्रश्नाकडे जा.

(7) तुमचे उत्तर निवडण्यासाठी दिलेल्या पर्याय बटनांपैकी एका पर्याय बटनावर क्लिक करा.

(8) तुमचे उत्तर बदलण्यासाठी दुस-या अपेक्षित पर्याय बटनावर क्लिक करा.

(9) तुमचे उत्तर सुरक्षित करण्यासाठी तुम्हाला **'Save and Next'** वर क्लिक **करावेच** लागेल.

(10) निवडलेले उत्तर रद्द करण्यासाठी त्या निवडलेल्या पर्यायावर पुन्हा क्लिक करा किंवा **'Clear Response'** बटनावर क्लिक करा.

(11) एखाद्या प्रश्नावर पडताळणीसाठी खूण करावयाची असल्यास **'Mark for Review & Next'** वर क्लिक करा. "जर पडताळणीसाठी खूण केलेल्या प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले असेल तर ते उत्तर अंतिम मूल्यांकनामध्ये ग्राह्य धरले जाईल."

(12) एखाद्या प्रश्नाचे उत्तर बदलण्यासाठी प्रथम तो प्रश्न निवडा, त्यानंतर नवीन उत्तर पर्यायावर क्लिक करा आणि नंतर **'Save and Next'** बटनावर क्लिक करा.

**(13) उत्तर दर्शवल्यानंतर सुरक्षित केलेले प्रश्न किंवा पडताळणीसाठी खूण केलेले प्रश्नच केवळ मुल्यांकनासाठी विचारात घेतले जातील.**

(14) त्या-त्या प्रश्नपत्रिकेमधील विभाग हे पटलाच्या (screen) वरच्या पट्टिकेवर (bar) दर्शविले जातील. एखाद्या विभागातील प्रश्न त्या विभागाच्या नावावर क्लिक करून पाहता येतील. तुम्ही जो विभाग पाहत आहात तो ठळकपणे दर्शविला जाईल.

(15) एखाद्या विभागातील अंतिम प्रश्नासाठी **'Save and Next'** बटनावर क्लिक केल्यानंतर आपण आपोआप त्याच विभागाच्या पहिल्या प्रश्नाकडे जाल.

(16) एखाद्या विभागातील प्रश्नांची स्थिती पाहण्यासाठी आपण माऊस कर्सर (mouse cursor) त्या विभागाच्या नावावर नेऊ शकता.

(17) तुमच्या सोयीनुसार तुम्ही परीक्षेच्या कालावधीत केव्हाही प्रश्नपत्रिकेतील विभाग आणि त्यातील प्रश्नांकडे जाऊ-येऊ शकता.

(18) परीक्षार्थींना 'परीक्षा प्रशासकाच्या' सूचनांचे काळजीपूर्वक पालन करण्याची विनंती आहे. जर एखादा परीक्षार्थी सूचनांचे/ नियमांचे पालन करीत नसेल, तर तो गैरवर्तणुकीचा/अप्रामाणिक मार्गाच्या अंगिकाराचा प्रकार समजला जाईल आणि असा परीक्षार्थी प्रशासकीय विभागाने ठरविलेल्या कालावधीसाठी परीक्षांना बसण्यास अपात्र ठरला जाईल.

(19) केवळ परीक्षा प्रारंभ होण्यापूर्वी परीक्षार्थी परीक्षा प्रशासकांना त्यांच्या शंका किंवा प्रश्न विचारू शकतात. परीक्षा प्रारंभ झाल्यानंतर कोणत्याही शंकेचे निरसन केले जाणार नाही.

(20) 120 मिनिटे संपल्यानंतर परीक्षार्थींना एकही प्रश्न सोडवता येणार नाही किंवा त्यांच्या उत्तरांची पडताळणी करता येणार नाही. जरी परीक्षार्थीने अंतिम 'submit' बटन क्लिक केले नसले तरीही त्याच्या/तिच्या उत्तरांना संगणक प्रणाली आपोआप सुरक्षित (save) करेल.

**(21) वस्तुनिष्ठ परीक्षेसाठी कृपया लक्षात घ्या-**

**(1) प्रत्यक्ष परिक्षेची वेळ संपल्याशिवाय परीक्षार्थींना पेपर 'अंतिमतः सादर' (finally submit) करू दिले जाणार नाही.**

**(2) एकदा परीक्षा प्रारंभ झाली की कोणत्याही परिस्थितीत परीक्षार्थ्याने की-बोर्ड ची कोणतीही key क्लिक करू नये, कारण त्यामुळे परीक्षाच बंद होईल.**

## (ब) सर्वसामान्य सूचनाः

(1) कृपया प्रवेशपत्रावर दर्शविलेले दिनांक, रिपोर्टिंग वेळ आणि परीक्षा केंद्राचा पत्ता याची दखल घ्यावी.

(2) तुम्ही ऑनलाईन परीक्षेच्या केंद्रावर पोहोचण्याची खातरजमा करण्यासाठी एक दिवस अगोदर परीक्षा केंद्र पाहून यावे, जेणेकरून परीक्षेच्या दिवशी तुम्ही तिथे (प्रवेश पत्रावर छापलेल्या) वेळेवर पोहोचू शकाल. उशीरा येणा-यांना प्रवेश दिला जाणार नाही.

(3) तुमचा नवीनतम फोटो चिकटवलेले प्रवेशपत्र तुम्हाला परीक्षा केंद्रावर आणावयाचे आहे. (प्रवेशपत्रावर शक्यतो तोच फोटो लावा जो तुम्ही अपलोड केला आहे)

(4) परीक्षा केंद्रावर तुम्हाला परीक्षा प्रशासक आणि विभागाचे प्रतिनिधी यांच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावयाचे आहे. सूचनांचे उल्लंघन केले गेल्यास तुम्हाला अपात्र समजले जाईल आणि परीक्षा केंद्र सोडून जाण्यास सांगितले जाईल.

(5) गणकयंत्र (स्वतंत्र किंवा घडयाळासह), पुस्तके, वह्या किंवा लिखित कागद, सेलफोन (कॅमेरा सुविधेसह/शिवाय), स्मार्ट वॉच अथवा इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक साधन यांचा वापर परीक्षेच्या कालावधीत करू दिला जाणार नाही.

(6) कृपया आपल्या सोबत नवीनतम फोटो चिकटवलेले प्रवेशपत्र आणि सध्या वैध, मूळ स्वरुपातील फोटो ओळख पत्र (जसे की, पॅन कार्ड/पारपत्र/वाहन चालक परवाना/फोटोसहित मतदान पत्र) आणावे. उमेदवारांना प्रत्येक सत्रात प्रवेशपत्रासोबत फोटो ओळखपत्राची छायांकित प्रत स्टेपल करून पर्यवेक्षकाकडे जमा करावी लागतील. आवेदन पत्रावर असणारे नाव (ऑनलाइन नोंदणीच्या वेळी जे उमेदवाराने दिलेले असते) फोटो- ओळख पत्रावरील नावाशी तंतोतंत जुळावयास हवे. विवाहानंतर ज्या महिला उमेदवारांचे पहिले/मधले/अंतिम नाव बदलले आहे त्यांनी ह्याची खास दखल घ्यावी. जर आवेदन पत्रावरील आणि फोटो-परिचय पत्रावरील नावात काहीही फरक असेल तर अशा उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही. **कृपया लक्षात घ्या - रेशन कार्ड आणि वाहनचालक शिकाऊ परवाना या परिक्षेसाठी वैध ओळखीचा पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही.** ज्या उमेदवारांनी आपल्या नावात बदल केला असेल, अशा उमेदवारांनी राजपत्रित अधिसूचना/विवाह प्रमाणपत्र सादर केले तरच त्यांना परिक्षेस बसण्यास अनुमती देण्यात येईल.

(7) बायोमेट्रिक डाटा (अंगठय़ाचा ठसा) आणि फोटो परीक्षा केंद्रावर परीक्षेच्या सुरवातीस घेतला जाईल. बायोमेट्रिक डाटाच्या सत्यता पडताळणीचा अंतिम निर्णय (जुळतो अथवा जुळत नाही) परीक्षा घेणा-या संस्थेचा असेल व उमेदवारांना बंधनकारक असेल. **बायोमेट्रिक डाटा परीक्षा दरम्यान कधीही घेण्यास/सत्यता पडताळणीस विरोध केल्यास उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल.** या संदर्भात खालील मुद्दे लक्षात घ्या:

(क) जर बोटांवर कसलाही थर असेल (शाई/मेहंदी/रंग इत्यादी) तर धुवून टाका आणि परिक्षेच्या दिवसाआधी तो थर संपूर्णपणे गेला आहे याची खात्री करून घ्या.

(ख) जर बोटांना मळ किंवा धूळ लागली असेल तर बोटांचे ठसे (Finger prints) घेण्याआधी धुवून घ्या आणि हातांची बोटं सुकली आहेत याची खात्री करून घ्या.

(ग) दोन्ही हातांची बोट सुकलेली आहेत याची खात्री करा आणि जर बोट ओलसर असतील तर प्रत्येक बोट पूसा.

(घ) ठसा घेतल्या जाणा-या अंगठय़ाला जर जखम/मार लागला असेल तर त्वरित परिक्षा केंद्रावर संबंधित अधिका-यास कळवा.

(या मुद्यांचे पालन करण्यास असमर्थ ठरल्यास परिक्षेस बसु दिले जाणार नाही.)

(8) तुम्ही दिलेल्या उत्तरांचे उत्तरांच्या सारखेपणासाठी इतर परीक्षार्थ्यांच्या उत्तरांबरोबर विश्लेषण केले जाईल. यासाठी अवलंब केलेल्या विश्लेषण प्रक्रियेतून जर उत्तरांची अदलाबदल केल्याचा व तुम्ही प्राप्त केलेले गुण वैध नसल्याचा निष्कर्ष आल्यास तुमची उमेदवारी रद्द केली जाऊ शकते. कोणीही परीक्षार्थी जर कॉपी करताना, सहाय्य घेताना किंवा देताना, किंवा परीक्षार्थ्यास न शोभणारी गैरवर्तणूक करताना आढळला तर त्याच्या/तिच्या उत्तरांची तपासणी केली जाणार नाही. विभाग अशा परीक्षार्थी विरूद्ध योग्य ती कारवाई करेल.

(9) तुम्ही स्वतः सोबत एक बॉल पॉईंट पेन अवश्य आणावे. तुम्ही स्वतःसोबत एक नीळे/काळे स्टँप इंक पॅड आणु शकता. कच्चे काम करण्यासाठी कागद पुरविले जातील; ज्यावर तुम्ही कच्चे काम करू शकता किंवा उत्तर निवडण्यापूर्वी पुन्हा एकदा पडताळणी करावयाच्या प्रश्नांचे क्रमांक लिहू शकता. प्रत्येक परीक्षा संपल्यावर कच्चे काम केलेले कागद प्रवेश पत्रासह पर्यवेक्षकाकडे जमा करावे लागतील.

(10) परीक्षेच्या व्यवस्थेमध्ये काही व्यत्यय येण्याची शक्यता पूर्णतः नाकारण्यात येणार नाही; ज्याचा परिणाम चाचणी वितरणावर आणि/किंवा निकाल तयार करण्यावर होऊ शकतो. अशा प्रसंगी असे व्यत्यय सुधारण्याचा पूर्णतः प्रयत्न केला जाईल, ज्यामध्ये उमेदवारांना एका जागेहून दुस-या जागेवर हलविणे किंवा परीक्षेस विलंब होणे गृहित आहे. पुन्हा परीक्षा घेणे या बाबतचा निर्णय हा परीक्षा घेणा-या प्रशासकीय विभागाचा निर्णय अंतिम असेल. उमेदवार पुन्हा परीक्षेसाठी कोणताही दावा करु शकणार नाही. ह्या विलंब झालेल्या प्रक्रीयेस उमेदवार जर हलण्यास तयार नसेल किंवा परीक्षा प्रक्रियेत भाग घेण्यास तयार नसेल अशा उमेदवारांना प्रक्रियेमधून संपूर्णपणे वगळण्यात येईल.

(11) परीक्षेची सामग्री तथा त्याबद्दलची कोणतीही अन्य माहिती, संपूर्ण किंवा भागांमधे उघड करणे, प्रकाशित करणे, पुन्हाः निर्माण करणे, ट्रांसमिट करणे, जमा करणे किंवा प्रसारण आणि जमा करणारे किंवा परिक्षा केंद्रामध्ये दिला जाणारा कागद घेऊन जाणारे किंवा परीक्षेच्या सामग्रीचा बेकायदेशीर वापर करणाऱ्यांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

(12) भरतीच्या प्रक्रियेतील कोणत्याही वेळी, परिक्षार्थी द्वारा खोटी माहिती देणे/किंवा प्रक्रियेच्या नियमांचे उल्लंघन करण्याबाबतीत, परिक्षार्थीस भरती प्रक्रियेमध्ये अपात्र घोषित केले जाईल. जर ह्या बाबतीत चालू असलेल्या प्रक्रियेमध्ये निदर्शनास आले नाही परंतु नंतर कधी लक्षात आल्यास त्याला प्रक्रियेच्या पहिल्या भागापासूनच अपात्र ठरविण्यात येईल.

(13) खाली दिलेल्या सामाजिक अंतर संबधीच्या सूचना काळजीपूर्वक वाचा.

## सामाजिक अंतर संबंधी सूचना

1. उमेदवारास परीक्षा केंद्रावर प्रवेश पत्रात दिलेल्या वेळेनुसार उपस्थित रहायचे आहे. उशीरा येणा-या उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही.

2. उमेदवारांचे परीक्षा अनुक्रमांक व लॅब क्रमांक परीक्षा केंद्राच्या बाहेर दर्शविले जाणार नाही, प्रत्येक उमेदवारास परीक्षा केंद्रावर प्रवेश करते वेळी यासंबंधी माहिती दिली जाईल.

3. परीक्षा केंद्रावर उमेदवारास आवश्यक लागणारे सामान
   **परीक्षा केंद्रावर उमेदवारास केवळ ठराविक खालील आणण्याची परवानगी असेल:**
   **अ. मास्क**
   **ब. स्वतःचे हँड सॅनिटाइज़र (50 मिली.)**
   **क. एक सामान्य पेन आणि स्टँप इंक पॅड (नीळे अथवा काळे)**
   **ड. परीक्षा संबंधी कागदपत्रे (प्रवेश पत्र तसेच ID कार्डची प्रत जोडलेले प्रवेश पत्र, सत्यता तपासण्यासाठी मूळ ID कार्ड)**
   **इ. लेखनिक (स्क्राइब) वापरणा-या उमेदवारांसाठी - व्यवस्थितरीत्या लिहिलेला व हस्ताक्षर केलेला स्क्राइब फॉर्म**
   **परीक्षा केंद्राच्या आत अन्य कोणतेही सामान नेण्याची परवानगी नसेल.**

4. उमेदवाराने आपले कुठलेही साधन/सामग्री इतरांना वापरण्यास देऊ नये.

5. उमेदवारांनी अन्य उमेदवारांसोबत सामाजिक अंतर राखणे गरजेचे आहे.

6. उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर सांगितलेल्या सूचनेनुसार रांगेत उभे राहावे.

7. उमेदवार जर लेखनीकाच्या सुविधेचा लाभ घेणार असेल तर लेखनीकाला सुद्धा स्वतःचा मास्क आणावा लागेल.

8. परीक्षा संपल्यावर उमेदवारांनी परीक्षा स्थळावरील स्टाफ द्वारा केलेल्या सूचनेनुसार गर्दी न करता व्यवस्थितरीत्या केंद्राबाहेर पडायचे आहे.

## आपणांस शुभेच्छा!